करोना २०२०/सूचनां/आदेश क्र. १०२

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय रायगड-अलिबाग
दुरध्वनी क्रमांक :- ०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२००१ फॅक्स क्रमांक: ०२१४१-२२२०२५/२२७४५१
Email :collector_raigad@maharshtra.gov.in Email dcraigad@gmail.com

---

क्र.साशा/कार्या-१/ब-५/आ.व्य./करोनाविषाणू/प्रतिबंधात्मक उपाययोजना/२०२० दि. २४/०३/२०२०

**महत्वाचे**

प्रति,

उपविभागीय अधिकारी(सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, रायगड
जिल्हा आरोग्य अधिकारी, रा.जि.प.
तहसिलदार (सर्व)
तहसिलदार (सर्वसाधारण)
मुख्याधिकारी (सर्व)
गटविकास अधिकारी (सर्व)
तालूका आरोग्य अधिकारी (सर्व)
आरोग्य अधिकारी ग्रामिण आरोग्य केंद्र (सर्व)

**विषय :- कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कार्यरत खाजगी वाहने व कर्मचारी यांना वाहन परवाना व ओळखपत्र देणेबाबत.**

राज्य शासनाने करोना विषाणू (COVID १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३/०३/२०२० पासून लागू करुन सदर कायद्यामधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे.

तसेच दिनांक २४/०३/२०२० रोजी मध्यरात्रीपासून दिनांक १४/०४/२०२० पर्यंत संपुर्ण देशात संचारबंदी (Lock Down) लागू करण्याचे मा.प्रधानमंत्री यांनी घोषित केले आहे. तथापी सदर कालावधीत अत्यावश्यक सेवा, जिवनावश्यक वस्तूंचा पुरवठा व स्वच्छता कर्मचारी यांच्या सेवा सुरू राहणे आवश्यक आहेत.

सरकारी कर्मचारी यांनी त्यांचे शासकीय ओळखपत्र आपल्या सोबत ठेवायचे आहे. शासकीय वाहनांसाठी, रूग्णवाहीका, अग्नीशमन दलाची गाडी इ.साठी वाहन परवाना आवश्यक नाही. फक्त खाजगी क्षेत्रातील व्यक्ती व वाहने जी COVID-१९ च्या कार्यास मदत करत आहेत अशा व्यक्तींना व वाहनांना सदर परवाने/ओळखपत्र देण्याची आहेत.

सदर जिवनावश्यक वस्तूंची वाहतूक करण्यासाठी तसेच मालाची चढ उतार करण्यासाठी मुख्यत्वेकरून खाजगी ट्रक, टेंम्पो इत्यादी वाहने तसेच कंत्राटी कामगार, खाजगी सफाई कर्मचारी,

अशासकीय सेवाभावी संस्था (NGO) चे प्रतिनिधी व इतर व्यक्तींच्या या कालावधीत सेवा घेण्यात येत आहेत. सदयस्थितीत संचारबंदीचे आदेश लक्षात घेता अत्यावश्यक सेवा/ जिवनावश्यक वस्तूं व वैद्यकीय संसाधने, औषधे इत्यादीची वाहतूक करणाऱ्या खाजगी वाहने तसेच कंत्राटी कामगार/ स्वच्छता कर्मचारी यांना वाहन परवाने व ओळखपत्रे देणे आवश्यक आहे. जेणेकरून अशा वाहनांच्या वाहतूकीमध्ये अडथळा निर्माण होणार नाही व अत्यावश्यक सेवा सुरळीतपणे चालू राहतील .

यास्तव वर नमूद केलेल्या सेवांसाठी वापरण्यात येणाऱ्या खाजगी वाहनांना तसेच खाजगी व्यक्तींना सोबत जोडलेल्या नमून्यात वाहन परवाना / ओळखपत्र आपल्या स्तरावरून निर्गमित करण्यात यावे. हे करत असताना नोंदवही ठेवून व्यवस्थित नावांची यादी तयार करून त्यांना क्रमांक देवून ओळखपत्र व वाहन परवाने वितरीत करावे. सदर व्यक्तींची व वाहनांची अदयावत यादी ठेवण्यात यावी व वेळोवेळी या कार्यालयास कळवावे.

(निधी चौधरी)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
रायगड-अलिबाग

प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक रायगड यांस माहितीस्तव.